# टॅलेंटचा वर्षाव करणारा ऋतुरंग

**प्रथमेश दोंड,** पोदार कॉलेज
muntainbox@gmail.com

मराठी भाषेचा वारसा आणि संस्कृती जपण्याच्या हेतूनं सुरू केलेला **पोदार कॉलेज**चा ऋतुरंग फेस्टिव्हल नुकताच जल्लोषात पार पडला. या फेस्टिव्हलचा 'महाराष्ट्र टाइम्स' मीडिया पार्टनर होता. स्पर्धकांच्या बुद्धीचातुर्याचा कस लागला, तो शोध खजिन्याचा या स्पर्धेमध्ये. माटुंगा परिसरातील ठरावीक ठिकाणी सुगावे शोधत या स्पर्धेत एच. आर कॉलेजने प्रथम क्रमांक पटकावला.

### अंतिम निकाल

**प्रथम क्रमांक:** सेंट झेविअर्स कॉलेज
**द्वितीय क्रमांक:** के. सी. कॉलेज
**तृतीय क्रमांक:** रुईया कॉलेज
**सर्वोत्कृष्ट सीएल:** प्रशिक कांबळे, डहाणूकर कॉलेज
**सर्वोत्कृष्ट एसीएल:** साहिल रामाणे, एच. आर. कॉलेज




महाराष्ट्र टाइम्स
मीडिया पार्टनर

### बहारदार सादरीकरणांची भुरळ

'मिस्टर अँड मिस ऋतुरंग'च्या अंतिम फेरीचं परीक्षण सिनेमा व वेब सीरिजचे निर्माते अक्षय बर्दापुरकर आणि अभिनेत्री क्रांती रेडकरने केलं. तर प्राथमिक फेरीचं परीक्षण तेजस डोंगरे आणि अक्षया गुरव या कलाकारांनी केलं. स्पर्धकांनी अंतिम फेरीत अभिनय, गायन, नृत्यकला, बिटबॉक्सिंग अशी एकापेक्षा एक बहारदार सादरीकरणांनी उपस्थितांना भुरळ घातली. के. सी. कॉलेजच्या सृजन देशपांडेला मिस्टर ऋतुरंग तर झेविअर्स कॉलेजच्या योगिनी चव्हाणला मिस ऋतुरंगाचा मान मिळाला.

### विनोदवीर

'रंग विनोदाचे' या स्टँडअप कॉमेडीच्या स्पर्धेतील स्पर्धकांनी प्रेक्षकांचं निखळ मनोरंजन केलं. यात काव्या धावले, आर्यन हरणे, राहुल देशमुखने अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला.

'नाट्याविष्कार' या स्पर्धेचं परीक्षण राधिका विद्यासागर आणि सुरभी भावे या अभिनेत्रींनी केलं. तर 'बोल मनाचे' स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून लेखक संतोष यांनी जबाबदारी सांभाळली. या स्पर्धेत मेघना पाटील, वेदांकी ढापरे, साहिल रामाणेने अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पटकावला. दोन वर्षांनी फेस्टिव्हल जल्लोषात पार पडल्यामुळे आयोजक विद्यार्थ्यांसह स्पर्धकांमध्येही उत्साहाचं वातावरण पाहायला मिळालं. संपूर्ण फेस्टिव्हल समितीच्या उत्तम नियोजन व समन्वयामुळे आणि टीचर इनचार्ज स्वाती बांगर यांच्या मार्गदर्शनानं यशस्वीरित्या पार पडला, अशी माहिती फेस्टिव्हलच्या आयोजक टीममधील सदस्य मिनल शिंदेने दिली.